# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 262 0601, 269 0602, 2641150/51, फॅक्स - 2692102.

तार - EDUTECH E-mail : dte_4a@rediff.com Internet :http/www.dte.org.in


**कालमर्यादीत**

क्रमांक : ४अ/आस्था/शिरापु/२००८-०९/१२८३

दिनांक : 20 नवम्बर NOV 2008

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपुर/अमरावती

२) सर्व प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित व विनाअनुदानीत
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र महाविद्यालये/
तंत्र निकेतन व तत्सम संस्था

विषय : <u>राज्य शिक्षक पुरस्कार २००८-२००९</u>

आपणांस कळविण्यात येते की, सन २००८-२००९ वर्षासाठी तंत्रशिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना राज्य शिक्षक पुरस्कार देण्याबाबत शासनास माहिती पाठवायची आहे. या संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांकः शिरापु १०९६/(२०४/९६)/समन्वय, दि.६.१२.१९९६ अन्वये नियम निर्धारीत केले असुन त्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. सदर शासन निर्णयान्वये पुरस्कारसाठी विहीत केलेली पात्रता व निकष पुढीलप्रमाणे आहेत.

१. शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणुन सेवा किमान २० वर्ष असावी.

२. शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या सर्व विषयांसाठी विद्यापीठ/परिक्षा मंडळ स्वायत्त संस्थेने त्या विषयाकरिता जितके तास विहीत केलेले आहेत तितके तास पूर्ण केले असावेत.

३. शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या सर्व विषयात हजेरीचे प्रमाण ७५ % असले पाहिजे.

४. शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० % विद्यार्थ्यांनी ६० % पेक्षा जास्त गुण प्राप्त केले पाहिजे. त्यातील १० % विद्यार्थ्यांनी ७५ % गुण प्राप्त केले पाहिजेत.

५. अलिकडील ३ वर्षात दर्जेदार पुस्तक लिहिणे,अध्ययन साहित्य तयार करणे, राज्यस्तरीय वा राष्ट्रीय पातळीवरील परिसंवादात सहभाग असणे,अध्यापनाचे कार्यात संगणकाचा वापर करणे, उजळणी वर्ग करणे तसेच संस्थेच्या सर्वागिण विकास कार्यात सहभाग असावा.

६. धारण करीत असलेल्या पदासाठी किमान आवश्यकपेक्षा जास्त असलेली अर्हता उंचावण्यासाठी प्रयत्नशील असला पाहिजे.

७. ५ वर्षाचे गोपनीय अहवाल तसेच ‘ परफॉर्मन्स अप्रायझल ’ चे मुल्यमापन किमान २ वर्षासाठी ‘ अत्युत्कृष्ट ’ व किमान २ वर्षासाठी ‘उत्कृष्ट ’ असणे आवश्यक आहे.

८. शिक्षकासंबंधी कोणतीही शिस्तभंगाची अथवा फौजदारी स्वरुपाची कार्यवाही प्रस्तावित अथवा सुरु असू नये.

९. विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासासाठी समाजाभिमुख तसेच रोजगारभिमुख करण्यासाठी ठोस प्रयत्न केलेले असावेत.

वर नमुद केल्यानुसार राज्य शिक्षक पुरस्कारासाठी विहीत केलेली सुधारीत पात्रता व निकष सर्वदृष्टीने पुर्ण करणा-या ( ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या बाबतीत अलिकडील म्हणजेच २००३-२००४ ते २००७-२००८ या वर्षातील किमान २ वर्षाचे ‘ अत्युत्कृष्ट ’ व किमान २ वर्षासाठी ‘ उत्कृष्ट ’ असलेल्या ) शिक्षक संवर्गात काम करीत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांसाठी जास्तीत जास्त दोन व तंत्रनिकेतनांतील शिक्षकांसाठी जास्तीत जास्त तीन शिक्षकांची माहिती प्राचार्यांनी सोबतच्या विवरणपत्रामध्ये **तीन प्रतीत संबधित सहसंचालक,तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय यांचेकडे दिनांक २५.११.२००८ पुर्वी वेगवेगळी पाठवावी.** सदर माहिती सोबत प्रत्येक निकषाच्या पृष्ठ्यर्थ पुरावा म्हणून आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे, पुस्तके इत्यादी पाठवावीत.

प्राचार्य हे पद शिक्षक संवर्गातील असून शासनाने वर नमुद केलेल्या दिनांक ६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वेय शिक्षक पुरस्कारासाठी विहीत केलेली सुधारीत पात्रता व निकष सर्वदृष्टीने पूर्ण करणा-या प्राचार्याची माहिती या कार्यालयास उपलब्ध नसल्याने त्यांनी वर नमुद केलेल्या विहीत विवरणपत्रात आवश्यक ती माहिती कागदपत्रे, प्रमाणपत्रांसह त्यांच्याशी संबंधित विभागीय कार्यालयाच्या सहसंचालकांना दिनांक २५.११.२००८ पूर्वी पाठवावी. सदर माहिती या संचालनालयाकडे संबंधित विभागीय कार्यालयामार्फतच सादर करावी. **थेट संचालनालयास सादर केलेल्या माहिती विचार केला जाणार नाही या बाबीची कृपया नोंद घ्यावी.**

दिनांक २५.११.२००८पर्यत वरील सूचनांनुसार आपल्या संस्थेतील / कार्यालयातील शिक्षक पुरस्कारासाठी आवश्यक असलेली माहिती संबंधित विभागीय कार्यालयाकडे प्राप्त न झाल्यास आपल्या संस्थेतील / कार्यालयातील

शिक्षक हे शिक्षक पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच शिक्षक पुरस्कारास पात्र उमेदवार नसल्यास तसे संबंधित विभागीय कार्यालयास दिनांक २५.११.२००८ पूर्वी कळविण्यात यावे व विभागीय कार्यालयाची माहिती निरंक असल्यास त्याप्रमाणेही कळविण्यांत यावे.

उपरोक्त सुचनांनुसार सहसंचालकांच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय, अशासकीय,अनुदानित-विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांची **माहिती दिनांक २५.११.२००८ पुर्वी निश्चितपणे प्राप्त करुन घ्यावी.** प्राप्त झालेली माहिती त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्यासह एकूण तीन सदस्यांच्या गठित केलल्या समिती कडुन प्राप्त झालेल्या शिफारसशींची योग्य प्रकारे व काटेकोरपणे छाननी करुन महाविद्यालयातील शिक्षक संवर्गातील २ व तंत्र निकेतनांतील शिक्षक संवर्गातील ३ शिक्षकांची शिफारस विहीत विवरणपत्रातील सविस्तर माहितीसह व प्रत्येक निकषाच्या पृष्ठयर्थ पुरावा म्हणून आवश्यक ती प्रमाणपत्रे, पुस्तके इत्यादी दोन प्रतीत तसेच **परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक त्या प्रपत्रासह या कार्यालयास दिनांक १५.१२.२००८ पर्यत** निश्चितपणे प्राप्त होईल याची दक्षता घेऊन सादर करावा. सदरची माहिती E-mail : dte_4a@rediff.com या ई-मेलव्दारे **ISM FONT** मध्ये तयार केलेल्या फाईलमध्ये ही पाठविण्यात यावी. विभागीय स्तरावर गठित करण्यात येणा-या समिती सदस्यांची नावे स्वतंत्रपणे कळविण्यांत येतील.

( डॉ. सु.का.महाजन )
प्र.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक ६ मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी

राज्य शिक्षक पुरस्कारासाठी सादर करावयाच्या माहितीचे विवरणपत्र ( तंत्र निकेतन / अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र )

| अ.क्र | अध्यापकाचे नाव, पदनाम, जन्मतारीख | शैक्षणिक अर्हता | शिक्षक पदावरील एकूण सेवेचा कालावधी व संपुर्ण तपशिल **गुण १०** | अध्यापकांना मागील पाच वर्षात दिलेले विषय ( दि.३१.०३.२००९) | मागील ५ वर्षात सर्व विषयासाठी विद्यापीठ /परीक्षा/मंडळ स्वायत्त संस्थेने विहित केलेल्या तासापेक्षा अधिक तास घेतले असल्यास प्रत्येक वाढीव ५ टक्के तासासाठी **२ गुण** व जास्तीत जास्त **१० गुण** | मागील ५ वर्षात रकाना ५मध्ये विहित केलेले तास पूर्ण केले किंवा कसे तपशिल ( विषयवार ) | मागील ५ वर्षात अध्यापकांची शिकविलेल्या विषयातील हजेरीचे प्रमाण ( विषयवार ) **गुण १०** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| | | | | | | | |

<table>
<tr><td colspan="3">मागील ५ वर्षात विद्यार्थ्यांची मिळविलेल्या गुणांची टक्केवारी</td><td rowspan="2">अलिकडील ५ वर्षात दर्जेदार पुस्तक लिहिले, अध्ययन साहित्य तयार करणे<br>Research, Publication, Monographs,<br>Review - 8<br>Research - 4<br>Projects<br>patents - 3<br>Question Paper -<br>गुण १५</td><td rowspan="2">निबंध प्रकाशन मासिकामधुन सर्वसामान्यासाठी ज्ञान व शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीकोनातुन लेखन तसेच महत्वाचा जबाबदा-या स्विकृत करणे त्यामध्ये कार्य करणे<br>Book Publication - 7<br>National Seminar's and Conference - 8<br>गुण १५</td><td rowspan="2">अलिकडील ५ वर्षात गोपनीय अहवालाची वर्षनिहाय प्रतवारी<br>१.२००३-२००४<br>२.२००४-२००५<br>३.२००५-२००६<br>४.२००६-२००७<br>५.२००७-२००८</td></tr>
<tr><td>एकूण विद्यार्थी</td><td>६० पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी<br>१० गुण</td><td>७५ पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी<br>गुण १०</td></tr>
<tr><td colspan="3">९.</td><td>१०.</td><td>११.</td><td>१२.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

| विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासासाठी समाजभिमुख करण्यासाठी केलेले ठोस प्रयत्न<br>गुण २० | एकूण गुण | अभिप्राय |
|---|---|---|
| १३. | १४. | १५. |